# <u>प्रेसनोट</u>

दि. ११/०६/२०२४

**पुणे महानगरपालिकेच्या औंध - बाणेर क्षेत्रीय कार्यालय, कर संकलन विभागातील दोन लिपीक टंकलेखकांवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ७० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. सुमित राजेंद्र चांदेरे, वय २८ वर्ष, पद – लिपीक टंकलेखक, (वर्ग-३)<br>२) श्री. प्रशांत शिवाजीराव घाडगे, वय ३४ वर्ष, पद – लिपीक टंकलेखक, (वर्ग-३) दोघे नेमणुक - कर संकलन विभाग, औंध - बाणेर क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका, |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- रुपये (विस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १०/०६/२०२४ व दि. ११/०६/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. ११/०६/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ११/०६/२०२४ रोजी सायंकाळी औंध - बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचे पार्कींगमध्ये, औंध, पुणे..

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांच्या बांधलेल्या नविन घराचे कर आकारणीसाठी माहे एप्रिल २०२४ मध्ये औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयात अर्ज केला होता. सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी लोकसेवक प्रशांत घाडगे यांचेकडे होता. तक्रारदार हे त्यांचे वरील कामासाठी लोकसेवक प्रशांत घाडगे यांचेकडे पाठपुरावा करीत असताना लोकसेवक प्रशांत घाडगे यांनी तक्रारदार यांना त्यांचे अर्जाप्रमाणे नविन बांधलेल्या घराची कर आकारणी कमी करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपये लाचेची मागणी केली व सदर बाब तक्रारदार यांनी लोकसेवक सुमित चांदेरे यांना सांगितली असता, त्यांनी तक्रारदार यांना लोकसेवक प्रंशात घाडगे यांचे सांगण्याप्रमाणे २५,०००/- रुपयांची लाच द्यावी लागेल असे सांगितल्याने, तक्रारदार यांनी लोकसेवक क्र. १ - सुमित चांदेरे व क्र. २ - प्रशांत घाडगे यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक क्र. १ - सुमित चांदेरे व क्र. २ - प्रशांत घाडगे यांनी तक्रारदार यांचेकडे नविन बांधलेल्या घराची कर आकारणी कमी करण्यासाठी व बिल कमी करुन सवलत दिल्याबाबत पंचासमक्ष तडजोडीअंती २५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक क्र. १ सुमित चांदेरे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये २५,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक अतुल भोसले तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.